कार्यालय सहाय्यक निबधक सहकारी संस्था

बदनापुर.दिंनाक १२.०३.२०१८

वाचा:-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६ चे कलम ७७ आय(२) आणि ७७ अ

ज्या अर्थी मांडवा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या मांडवा ता बदनापुर हि संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार नोदवलेली आहे व संस्थेने उक्त अधिनियम नियम व तिच्या उपविधितील शर्तीचे पालन करणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(२)मधील तरतुदीनुसार संस्थेच्या समितीच्या मुदत संपण्यापुर्वी तिची निवडणूक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास कळविणे हे समितीचे कर्तव्य आहे समितीने तिची निवडणूक घेण्यासंबंधात राज्य सहकारी प्राधिकरणास कळविण्यात बुद्धीपुरस्पर कसूर केला असेल तेव्हा समितीच्या पदावधी संपल्यानंतर तिचे सदस्य अधिकारपद धारण करण्यांचे बंद करतील आणि अशा परीस्थितीत निबधक अधिनियमाच्या कलम ७७ अ अन्वये कार्यवाही करील.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१४) नुसार या कार्यालयातील उपलब्ध माहिती आधारे आपल्या संस्थेची निवडणूक घेण्याबाबत राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाला कळविण्यात आले अदयाप पर्यत या कार्यालयास मतदार यादी प्राप्त झाली नाही व निधीही प्राप्त झाला नाही .

त्याअर्थी उक्त संस्थेच्या समितीचा पदावधी संपुष्टात आलेला असल्याने संस्थेची निवडणुक घेण्यास येणे आवश्यक आहे म्हणुन समिती सदस्यावर त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक असल्याने त्यांना अशी नोटीस प्रसिद्ध करणे वाजवीरीत्या व्यवहार्य नाही अशी माझी खात्री झाली आहे सबब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१)(ब) मधील तरतुदी नुसार संस्थेची समिती निष्प्रभावित करुन संस्थेचे दैनंदिन कामकाज पार पडण्यासाठी व निवडणुक प्रक्रिया पुर्ण करण्या करीता संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करणे आवश्यक झाल्याने मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश .**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (१)(ब) आणि (फ) (दोन) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी डॉ ए.बी.काशीकर सहाय्यक निबधक सहकारी संस्था बदनापुर ता बदनापुर जि जालना मांडवा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या मांडवा ता बदनापुर जि जालना या संस्थेचे सांप्रतचे संचालक मंडळ निष्प्रभावित करीत आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१)(फ)(दोन)अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी श्री बी.ए.सिरसाठ भागचौकसणिस शाखा नविन जालना जालना यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे त्यांनी सदरील संस्थेचा पदभार घेवून तसा अहवाल या कार्यालसास सादर करावा आणि संस्थेची निवडणुक प्रक्रीया त्वरीत सुरु करुन दोन महीन्याच्या आत पुर्ण करावी सदरचे आदेश माझे सही व शिक्यानिशी आज दिंनाक १२.०३.२०१८ रोजी पारीत करीत आहे.

(डॉ ए.बी.काशीकर)
सहाय्यक निबधक
सहकारी संस्था बदनापुर

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बदनापूर

प्रतिलीपी

१) श्री संचालक मांडवा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या मांडवा यानां माहिती व पुढील कार्यवाहीस्तव रवाना.

१) मा विभागीय सहनिंबधक सहकारी संस्था औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर

२) मा जिल्हा उपनिंबधक सहकारी संस्था जालना यांना माहितीस्तव सविनय सादर

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था,बदनापूर.

भारतीय डाक
RL BADNAPUR S.O (431202)